**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.**
**मा.स्थायी समिती**
**कार्यपत्रिका क्रमांक - १५२**
**सभावृत्तांत**

दिनांक - २७/०१/२०१५ वेळ - सकाळी ११.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार, दिनांक २७/०१/२०१५ रोजी सकाळी ११.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.शेंडगे आशा सुखदेव
२) मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड

याशिवाय मा.गावडे-सह आयुक्त, मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.फुंदे,मा.दुरगुडे,मा.दंडवते-सहा.आयुक्त,मा.पवार-कायदा सल्लागार,मा.साळुंके – मुख्य उद्यान अधिक्षक, मा.खाबडे-कार्यकारी अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------

सभा कामकाज भरवणेसाठी नेमलेल्या वेळी आवश्यक गणसंख्या सभागृहात उपलब्ध नसल्याने उपस्थीत सन्मा.सदस्य यांनी शुक्रवार दिनांक ३०/१/२०१५ रोजी सकाळी ११:०० वाजेपर्यंत सभा तहकूब केली.

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.**
**मा.स्थायी समिती**
**कार्यपत्रिका क्रमांक - १५२**
**<u>सभावृत्तांत</u>**
**<u>(दिनांक २७/१/२०१५ ची तहकूब सभा)</u>**

दिनांक - ३०/१/२०१५ वेळ - सकाळी ११.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची दिनांक २७/१/२०१५ रोजीची तहकूब सभा शुक्रवार, दिनांक ३०/१/२०१५ रोजी सकाळी ११.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.वाघेरे सुनिता राजेश
२) मा.बारणे माया संतोष
३) मा.लोंढे गणेश नारायण
४) मा.कदम सदगुरु महादेव
५) मा.भोंडवे संगिता राजेंद्र
६) मा.शेंडगे आशा सुखदेव
७) मा.गायकवाड संध्या सुरदास
८) मा.भालेकर शांताराम कोंडीबा उर्फ एस.के.बापु
९) सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग
१०) मा.तरस बाळासाहेब जयवंत
११) मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड
१२) मा.अतुल अरविंद उर्फ नानासाहेब शितोळे
१३) मा.प्रसाद शेट्टी

याशिवाय मा.तानाजी शिंदे–अति.आयुक्त,मा.उल्हास जगताप-नगरसचिव,मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.डॉ.रॉय-आरोग्य वैद्यकीय अधिकारी,मा.भोसले-मुख्यलेखापाल, मा.गावडे-सहआयुक्त, मा.पाटील, मा.चव्हाण-सहशहर अभियंता,मा.सुरगुडे-विकास अभियंता,मा.कुलकर्णी,मा.फुंदे,मा.दुरगुडे-सहा.आयुक्त, मा.पवार-कायदा सल्लागार, मा.साळुंके-मुख्य उद्यान अधिक्षक, मा.सातव-प्र.शिक्षणाधिकारी (माध्य.), मा.निकम,मा.इंगळे, मा.काची,मा.चव्हाण,मा.कपिले, मा.थोरात, मा.खाबडे,मा.दांगट,मा.बरशेट्टी, मा.जुंधारे, मा.घोडे,मा.गट्टूवार-कार्यकारी अभियंता, मा.शिंपी-नगरररचनाकार, मा.अष्टेकर-पीएमपीएमएल,मा.बहुरे, मा.पाटील-प्र.अधिकारी, मा.जरांडे-सुरक्षा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.

सूचक – मा.सुनिता वाघेरे                                        अनुमोदक – मा.संध्या गायकवाड

सभा कामकाज भरवणेसाठी नेमलेल्या वेळी मा.सभापती हे सभागृहात उपस्थित नसल्याने मा.स्थायी समिती सदस्य मा.भालेकर शांताराम कोंडीबा ऊर्फ एस.के.बापु यांची सभाध्यक्ष म्हणून निवड करणेत यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

(मा.भालेकर शांताराम कोंडीबा ऊर्फ एस.के.बापु यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारले.)

----------

खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक : मा.सदगुरु कदम                                        अनुमोदक : मा.प्रसाद शेट्टी

मा.शहर अभियंता श्री.एम.टी. कांबळे सो. यांचे वडील श्री.यल्लाप्पा कांबळे यांचे वृद्धापकाळाने निधन झाले असल्यामुळे त्यांना या सभेमध्ये श्रद्धांजली वाहण्यात यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

( सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली )

----------

दिनांक २०/०१/२०१५ रोजी सकाळी ११.०० वा व दु.१.०० वा. झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.१५१) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक – १०५६८                                        विषय क्रमांक – १

दिनांक – २७/०१/२०१५                                        विभाग – स्थापत्य पर्यावरण

सुचक –मा.सुनिता वाघेरे                                        अनुमोदक – मा.माया बारणे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.पापु/६/कावि/७९२/१४ दि.१२/६/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

उपकार्यकारी अभियंता, खडकवासला पाटबंधारे विभाग, पुणे.११ यांचे पत्र क्र.खपावि/प्रशा-३/२३०३/सन २०१४ दि. २६/०३/२०१४ अन्वये कळविले प्रमाणे, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील पवना नदीच्या पुररेषा आखणीसाठी कामाच्या सल्लामसलत शुल्क (सेवाकरासह) र.रु.१०,७८,७००/- आणि करारनामा व इतर कार्यालयीन खर्च र.रु.२१,३००/- असे एकूण र.रु.११,००,०००/- (अक्षरी र.रु.अकरा लाख) उपकार्यकारी अभियंता, खडकवासला पाटबंधारे विभाग, पुणे.११ यांचे नावे अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १०५६९                                        विषय क्रमांक – २

दिनांक – २७/०१/२०१५                                        विभाग – स्थापत्य

सुचक –मा.संगिता भोंडवे                                        अनुमोदक – मा.सदगुरु कदम

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/लेखा/३इ/कावि/३३८/१४ दि.६/१२/२०१४

विषय - प्र.क्र.३१ दिघी मधील चौधरी पार्क, काटेवस्ती, विजयनगर, रूणवाल पार्क इ. ठिकाणचे

डांबरीकरण करणेबाबत...

विषय क्रमांक २चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १०५७० विषय क्रमांक – ३

दिनांक – ३०/०१/२०१५ विभाग – स्थापत्य

सुचक –मा.आशा शेंडगे अनुमोदक – मा.विनायक गायकवाड

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/लेखा/१/कावि/८१४/१४ दि.६/१२/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.३३/२०१४-१५ मधील अ.क्र.१ अन्वये, दापोडी ते निगडी या बीआरटीएस कोरीडोरचे डांबरीकरण करणे अंतर्गत बीआरटीएस साठी फुटपाथची रूंदी कमी करून सर्व्हिस लेनची रूंदी वाढविणेकामी मे.क्लिन्सी कन्स्ट्रक्शन प्रा.लि., पुणे (नि.र.रु.३,९७,५५,०७५/- (अक्षरी र.रु.तीन कोटी सत्यान्नव लाख पंचावन्न हजार पंच्याहत्तर फक्त) पेक्षा १६.७१ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजुर दराने र.रु.३,४७,६७,६०२/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १०५७१ विषय क्रमांक – ४

दिनांक – ३०/०१/२०१५ विभाग – स्थापत्य

सुचक –मा.संध्या गायकवाड अनुमोदक – मा.सुनिता गवळी

संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/१अ/कावि/४०८/१४ दि.२४/१२/२०१४

विषय - प्रभाग क्रमांक १६ आकुर्डी मध्ये पेव्हिंग ब्लॉक दुरुस्ती व आवश्यक त्या ठिकाणी पेव्हिंग ब्लॉक बसविणेबाबत...

विषय क्रमांक ४चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १०५७२ विषय क्रमांक – ५

दिनांक – ३०/०१/२०१५ विभाग – स्थापत्य

सुचक –मा.बाळासाहेब तरस अनुमोदक – मा.विनायक गायकवाड

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/लेखा/३इ/कावि/४००/१५ दि.५/०१/२०१५

विषय - प्र.क्र.७ च-होली येथील ताजणेमळा, काळजेवाडी कोतवालवाडी पठारे मळा व इतर ठिकाणचे अंतर्गत रस्ते खडीकरण व बीबीएम करणेबाबत...

विषय क्रमांक ५ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १०५७३ विषय क्रमांक – ६
दिनांक – ३०/०१/२०१५ विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक –मा.अतुल शितोळे अनुमोदक – मा.प्रसाद शेट्टी

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मभां/०४/कावि/२१/१५ दि.१२/०१/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे विविध विभागास आवश्यक छपाई साहित्य खरेदीकामी ई नि.सु.क्र.२२/२०१४-१५ मधील अ.क्र.०१ अन्वये, लघुत्तम निविदाकार १)मे.अमृत मुद्रणालय, चिंचवड यांचे एकुण बाबी १४ साठी र.रु. ५,२१,९८०/- २) मे.विशाल एंटरप्रायजेस, रहाटणी यांचे एकुण बाबी २७ साठी र.रु. ७,४६,८३५/-, ३) मे. विजय मुद्रणालय, पुणे यांचे एकुण बाबी १९ साठी र.रु. ३,८३,२८५/-, ४) मे.जय गणेश ऑफसेट, पुणे यांचे एकुण बाबी ४९ साठी र.रु.२३,९२,८७७/- नुसार मनपा विविध विभागाकडील छपाईकामी एकुण र.रु. ४०,४४,९७७/- (अक्षरी र.रू.चाळीस लाख चव्वेचाळीस हजार नऊशे सत्याहत्तर) चे खर्चास मान्यता व त्यांचे बरोबर करारनामा करुन खरेदीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १०५७४ विषय क्रमांक – ७
दिनांक – ३०/०१/२०१५ विभाग – स्थापत्य
सुचक –मा.संध्या गायकवाड अनुमोदक – मा.सदगुरु कदम

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/३क/कावि/४/१५ दि.१२/१/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२५/२०१४-१५ मधील अ.क्र.४६ अन्वये, प्रभाग क्र.६० सांगवी स्मशानभूमी ते प्रियदर्शनीनगर पवनानदी संगमावर संरक्षक भिंत (गॅबियन वॉल) बांधणेकामी मे.आमेगा एंटरप्रयजेस (नि.र.रु.१,८६,७४,१३६/- (अक्षरी र.रु.एक कोटी शहाऐंशी लाख चौ-याहत्तर हजार एकशे छत्तीस) पेक्षा १९.०० % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.१,५८,८२,३५३/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १०५७५ विषय क्रमांक – ८
दिनांक – ३०/०१/२०१५ विभाग – विद्युत
सुचक –मा.सुनिता वाघेरे अनुमोदक – मा.माया बारणे

संदर्भ:- मा.सहशहर अभियंता यांचे पत्र क्र.विमुका/४/कावि/७/१५ दि.१३/१/२०१५

मा.सहशहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील नि.नो.क्र.१२/२०१४-१५ मधील अ.क्र.३ अन्वये, मुख्य प्रशासकीय इमारतीमधील दुरध्वनी, फॅक्स, एफ.सी.टी.राऊटर यंत्रणेचे कामकाज करणेकामी मे.पार्सन टेक्नोलॉजीस प्रा.लि. (नि.र.रु.८,९३,१२५/- (अक्षरी र.रु. आठ लाख त्र्यान्नव हजार एकशे पंचवीस) पेक्षा -७.५% कमी) दराने त्यांच्याबरोबर करारनामा करुन कामाचा आदेश देणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १०५७६ विषय क्रमांक – ९
दिनांक – ३०/०१/२०१५ विभाग – क्रीडा
सुचक –मा.संगिता भोंडवे अनुमोदक – मा.सदगुरु कदम
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/७२१/१४ दि.२९/१२/२०१४
विषय – क्रीडा विभागाकडील ई निविदा नोटीस क्र.१/११:२०१३-१४ कासारवाडी जलतरण तलाव पाणी शुध्दिकरण, परिसर स्वच्छता, साफसफाई देखभाल व यांत्रिक देखभाल दुरुस्ती कामकाजाबाबत...

विषय क्रमांक ९चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १०५७७ विषय क्रमांक – १०
दिनांक – ३०/०१/२०१५ विभाग – स्थापत्य
सुचक –मा.आशा शेंडगे अनुमोदक – मा.बाळासाहेब तरस
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/४ड/कावि/१८/१५ दि.१३/१/२०१५
विषय - औंध-रावेत रस्त्यापासुन कस्पटेवस्ती स्मशानभुमी पर्यंतचा २४.०० मी. रूंदीचा रस्ता विकसित करणे (प्रभाग क्र.५४ विशालनगर मधुन जाणारा) बाबत...

विषय क्रमांक १०चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १०५७८ विषय क्रमांक – ११
दिनांक – ३०/०१/२०१५ विभाग – स्थापत्य
सुचक –मा.संध्या गायकवाड अनुमोदक – मा.सुनिता गवळी
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/४ड/कावि/१७/१५ दि.१३/१/२०१५
विषय - विशालनगर पिंपळेनिलख येथील सर्व्हे नं.४, ५, ६, ७, ८ मधील पावसाळी नाला विकसीत करणेबाबत...

विषय क्रमांक ११चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १०५७९ विषय क्रमांक – १२
दिनांक – ३०/०१/२०१५ विभाग – वृक्षसंवर्धन
सुचक –मा.बाळासाहेब तरस अनुमोदक – मा.विनायक गायकवाड
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वृ.सं./४/कावि/१६/१५ दि.३/१/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या वृक्षप्राधिकरणाचे सन २०१४-१५ चे सुधारीत र.रू.१५,२८,२१,०००/- व सन २०१५-१६ चे मुळ अंदाजपत्रक र.रू.१५,६५,२१,०००/- प्रस्तावासोबत जोडणेत आलेल्या वृक्ष प्राधिकरण ठराव क्र.११ दि.१२/११/२०१४ चे अंदाजपत्रकास तपशिलाप्रमाणे मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १०५८० विषय क्रमांक – १३
दिनांक – ३०/०१/२०१५ विभाग – उदयान/वृक्षसंवर्धन
सुचक –मा.अतुल शितोळे अनुमोदक – मा.प्रसाद शेट्टी
संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे पत्र क्र.उद्यान/४/कावि/८/२०१५ दि.७/१/२०१५

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे उदयान विभागाकडील निविदा नोटीस क्र.११/२०१४-१५ अन्वये, भोसरी स.नं.१३१ कचरा डेपो येथील वृक्षारोपणाची दोन वर्षे देखभाल करणेकामी मे.**अर्थव स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्या.** (निविदा रक्कम रूपये ९,७३,५८०/- (अक्षरी र.रू. नऊ लाख त्र्याहत्तर पाचशे ऐंशी) या ठेकेदाराची निविदा अंदाजपत्रकिय दरापेक्षा -२९.७५% ने जास्त दराची निविदा स्विकृत करणेत आली असून त्यांचेशी करारनामा करून घेणेस व प्रस्तुतकामी २ वर्षे कालावधीसाठी येणारे प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १०५८१ विषय क्रमांक – १४
दिनांक – ३०/०१/२०१५ विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक –मा.अतुल शितोळे अनुमोदक – मा.प्रसाद शेट्टी
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मभां./०४/कावि/३८/१५ दि.१६/१/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे विविध विभाग व पाणी पुरवठा व जलनि:सारण विभाग कडील मोजमाप पुस्तके (मेझेरमेंट बुक) यापुर्वीचे ई-निविदा सुचना क्र.०४/०१/२०१४-१५ चे मंजुर दरानुसार मे.अमृत मुद्रणालय, चिंचवड यांचेकडुन आवश्यक मागणीनुसार मोजमाप पुस्तके (मेझेरमेंट बुक) ५०० नग छपाई कामी येणारा एकुण खर्च र.रु.३६,२५०/- (अक्षरी र.रू. छत्तीस हजार दोनशे पन्नास) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १०५८२ विषय क्रमांक – १५
दिनांक – ३०/०१/२०१५ विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक –मा.सुनिता वाघेरे अनुमोदक – मा.माया बारणे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मभां./२०/कावि/२६/१५ दि.१६/१/२०१५
विषय - मनपाचे क्रीडा विभागांतर्गत खेळाडू दत्तक योजना अनुषंगाने अँथलेटीक्स व नेमबाजी करीता क्रीडा विभागास क्रीडा साहित्य खरेदी करणेबाबत...

विषय क्रमांक १५चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १०५८३ विषय क्रमांक – १६
दिनांक – ३०/०१/२०१५ विभाग – स्थापत्य
सुचक –मा.संगिता भोंडवे अनुमोदक – मा.सदगुरु कदम
संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/लेखा/३फ/९१/१४ दि.१६/१/२०१५

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.स्थापत्य/फ मुख्यालय/HO/२७/२०१४-१५ मधील अ.क्र.७ अन्वये, फ प्रभागातील विविध स्पर्धासाठी मैदान खेळपट्ट्या बनविणे व विकास कामे करणेकामी M/S VYANKATESHWARA CONSTRUCTION (नि.र.रू.१७,७८,७१२/-(अक्षरी र.रू.सतरा लाख अठ्ठ्याहत्तर हजार सातशे बारा) पेक्षा -४०.५०% कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.११,११,२५०/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १०५८४ विषय क्रमांक – १७
दिनांक – ३०/०१/२०१५ विभाग – आकाशचिन्ह व परवाना
सुचक –मा.आशा शेंडगे अनुमोदक – मा.सुनिता वाघेरे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.आप/७/कावि/१२/२०१५ दि.१६/१/२०१५
विषय – सन २०१५-२०१६ आर्थिक वर्षाकरिता आकाशचिन्ह जाहिरात कर व जागा भाडेदर निश्चितीबाबत...

विषय क्रमांक १७चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १०५८५ विषय क्रमांक – १८
दिनांक – ३०/०१/२०१५ विभाग – जलनि:सारण
सुचक –मा.संध्या गायकवाड अनुमोदक – मा.सुनिता गवळी
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.जनि/२/कावि/६४७/२०१५ दि.१६/१/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या जलनि:सारण विभागाकडील नि.नो.क्र.१४/१२/२०१४-१५ मधील अ.क्र.१२ अन्वये, आकुर्डी मलशुध्दीकरण प्रकल्पा अंतर्गत आकुर्डी येथील कुकी नाल्या मधुन पांढरकरनगर पासून हॉटेल सावली पर्यंत मुख्य जलनि:सारण नलिका टाकणे व आवश्यकतेनुसार भुयारी गटर नलिका टाकणे. तसेच इतर जलनि:सारण विषयक आवश्यक सुधारणा कामे करणेकामी मे.व्यंकटेश्वरा कन्स्ट्रक्शन (नि.र.रु.८४,०३,३५७/- (अक्षरी र.रु.चौ-याऐंशी लाख तीन हजार तीनशे सत्तावन्न) पेक्षा १५.३०% कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.७४,७३,५२६/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १०५८६ विषय क्रमांक – १९
दिनांक – ३०/०१/२०१५ विभाग – स्थापत्य
सुचक –मा.बाळासाहेब तरस अनुमोदक – मा.विनायक गायकवाड
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/लेखा/३फ/कावि/९२/१४ दि.१६/१/२०१५
विषय - प्रभाग क्र.५ मधील विकास आराखडयातील रस्ते विकसित करणेबाबत...

विषय क्रमांक १९चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १०५८७ विषय क्रमांक – २०
दिनांक – ३०/०१/२०१५ विभाग – स्थापत्य
सुचक –मा.अतुल शितोळे अनुमोदक – मा.प्रसाद शेट्टी
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/लेखा/३फ/कावि/९३/१४ दि.१६/१/२०१५
विषय - प्रभाग क्र.३ चिखली मध्ये देहू आळंदी रस्ता ते शिवेचा रस्ता विकसीत करणेबाबत...

विषय क्रमांक २०चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १०५८८ विषय क्रमांक – २१
दिनांक – ३०/०१/२०१५ विभाग – स्थापत्य
सुचक –मा.संगिता भोंडवे अनुमोदक – मा.आशा शेंडगे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/लेखा/३फ/कावि/९४/१४ दि.१६/१/२०१५
विषय - प्रभाग क्र.५ सवतामाली मंदीर ते विसावा हॉटेल रस्ता विकसित करणेबाबत...

विषय क्रमांक २१चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १०५८९ विषय क्रमांक – २२
दिनांक – ३०/०१/२०१५ विभाग – स्थापत्य
सुचक –मा.सुनिता वाघेरे अनुमोदक – मा.माया बारणे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/लेखा/१/कावि/९५/१४ दि.१६/१/२०१५
विषय - प्रभाग क्र.५ कुदळवाडी-जाधववाडी मधिल कुदळवाडी सेक्टर नं. १३, १६, पवारवस्ती, हरगुडेवस्ती, नेवाळेवस्ती, चिखली गावठाण येथील सर्व अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणेबाबत...

विषय क्रमांक २२चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १०५९० विषय क्रमांक – २३
दिनांक – ३०/०१/२०१५ विभाग – स्थापत्य
सुचक –मा.संगिता भोंडवे अनुमोदक – मा.सदगुरु कदम
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/लेखा/३फ/कावि/९६/१४ दि.१६/१/२०१५
विषय - प्रभाग क्र.२ चिखली आकुर्डी रस्ता ते सानेवस्ती रस्ता विकसित करणेबाबत...

विषय क्रमांक २३चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – १०५९१ विषय क्रमांक – २४
दिनांक – ३०/०१/२०१५ विभाग – विद्युत मुख्य कार्यालय
सुचक –मा.आशा शेंडगे अनुमोदक – मा.सुनिता गवळी

संदर्भ:- मा.विकास अभियंता यांचे पत्र क्र.विमुका/५/कावि/१०/२०१५ दि.१७/१/२०१५

मा.विकास अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील नि.नो.क्र.४/२०१४-२०१५ मधील अ.क्र.५ अन्वये, प्रभाग क्र.५५ मधील रस्त्यावर जुन्या खिळण्या बदलुन उर्जाबचत करणा-या एल.ई.डी. खिळण्या बसविणेकामी मे.हसन इलेक्ट्रीकल इंजिनिअरिंग (नि.र.रु १४,०१,३०५/- [अक्षरी र.रू.चौदा लाख एक हजार तिनशे पाच] दर ३.१०% कमी) या ठेकेदाराबरोबर करारनामा करुन कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १०५९२ विषय क्रमांक – २५
दिनांक – ३०/०१/२०१५ विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक –मा.संध्या गायकवाड अनुमोदक – मा.सुनिता गवळी

संदर्भ:- मा.सह आयुक्त यांचे पत्र क्र.मभां/०४/कावि/४२/१५ दि.१७/०१/२०१५

मा.सह आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे विविध विभागास आवश्यक मनपा दैनंदिनी २०१५ छपाई साहित्य खरेदीकामी ई-नि.सु.क्र. २६/२०१४-१५ अन्वये लघुत्तम निविदाकार मे.व्ही.एम.शिंदे, जुनी सांगवी यांचे मनपा दैनंदिनी प्रती नग र.रु.७२/- याप्रमाणे ७,००० नगासाठी एकुण र.रु. ५,०४,०००/- चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १०५९३ विषय क्रमांक – २६
दिनांक – ३०/०१/२०१५ विभाग – सुरक्षा
सुचक –मा.बाळासाहेब तरस अनुमोदक – मा.विनायक गायकवाड

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.सुवि/३/कावि/८३/१५ दि.१७/०१/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सुरक्षा विभागामार्फत ई-नि.सु.क्र.१/२०११-२०१२ नुसार नविन संस्था/एजन्सी/ठेकेदार/निविदाकारास सुरक्षा रक्षक पुरविणेचे कामाचे आदेश क्र. सुवि/३/कावि/६३/२०१३ दि.१८/१/२०१३ नुसार दि.३१/१/२०१४ अखेर दिलेले आहेत. सद्यस्थितीत मा.आयुक्त यांचे कडील दि.२२/०७/२०१४ चे मान्य प्रस्तावानुसार सदर कामास दि.०१/०८/२०१४ ते ३१/१०/१४ पर्यतचे कामकाजास व मुदतवाढीस मा.स्थायी समिती ठराव क्र.७८७४ दि.२५/०८/२०१४ नुसार १)मे.एल.एम.सी.सि.फोर्स प्रा.लि. यांना १२०, २)मे.युनिक डेल्टा फोर्स सिक्युरिटी प्रा.लि.यांना १२६, ३)मे.श्रीकृपा सर्व्हिसेस यांना १२५ सुरक्षा रक्षक असे एकुण ३७१ सुरक्षा रक्षक पुरवून कामकाज करणेस मान्यता देण्यात आलेली आहे. सदर कामकाजाची मुदत दि.३१/१०/२०१४ रोजी संपत असुन ३७१ रखवालदार मदतनीस पुरविणे करीता नव्याने रखवालदार मदतनीस पुरविणेची ई-निविदा सुचना प्रसिध्द करुन कामाचे आदेश देणेची कार्यवाही करावी लागणार असल्याने सदर कामकाजास बराच कालावधी लागु शकतो तरी यापूर्वीचेच संस्था/ठेकेदार यांना माहे नोव्हेंबर २०१४ पासून पुढील कालावधीकरीता १)मे.एल.एम.सी.सि.फोर्स प्रा.लि. १२०, २)मे.युनिक डेल्टा फोर्ससिक्युरिटी प्रा.लि. १२६, ३)मे.श्रीकृपा सर्व्हिसेस १२५, यांना सुरक्षा रक्षकांचे कामाचे आदेश देणे आवश्यक आहे. तरी मा.स्थायी समिती सभा

कार्यक्रम पत्रिका क्र.१४८ दि.३०/१२/२०१४ चे सभावृत्तांतानुसार विषय क्रमाक २५ बाबत ठराव क्र.१०१२१ नुसार सदर संस्था / ठेकेदार यांना निविदेनुसार कामाचे आदेश देऊन प्रत्यक्ष कामकाज सुरु होईपर्यंतचे कालावधीस मुदतवाढीस मा. आयुक्त यांची मान्यता असली तरी त्यांना दि.३१/१/२०१५ पर्यंत मुदतवाढ देण्यास व वेळोवेळी लागु होणा-या महागाई भत्यानुसार येणा-या खर्चास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे असा ठराव मंजूर करणेत आला असल्याने ई-निविदा प्रक्रियेस लागणारा कालावधी व प्रत्यक्ष कामकाज सुरू होईपर्यंतचे कालावधी विचारात घेता संबंधित संस्था/ठेकेदार यांना निविदेनुसार कामाचे आदेश देवून प्रत्यक्ष कामकाज सुरू होईपर्यंतचे कालावधीस मुदतवाढीस व वेळोवेळी लागु होणा-या महागाई भत्ता व इतर भत्यानुसार येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १०५९४ विषय क्रमांक – २७

दिनांक – ३०/०१/२०१५ विभाग – सुरक्षा

सुचक –मा.अतुल शितोळे अनुमोदक – मा.प्रसाद शेट्टी

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.सुवि/३/कावि/८४/१५ दि.१७/०१/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमिक शिक्षण विभागांतर्गत असलेल्या १८ माध्यमिक विद्यालये व १ क्रीडा प्रबोधिनी मुलांचे वसतीगृह व शिक्षण मंडळाकडील १३४ प्राथमिक शाळा इमारत व परिसराची २४ तास सुरक्षितता करणेकामी इच्छुक निविदाधारकांकडून प्रभाग निहाय ई-टेंडर निविदा मागविण्यात आली होती. निविदा नोटीस क्र.०५-ते८/२०१२-१३ अन्वये अ प्रभाग व ब प्रभाग कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील शाळेवरील सुरक्षा व्यवस्था करणेकामी मे.एल.एम.सी.सि.प्रा.लि. आकुर्डी पुणे, यांना अनुक्रमे १)आदेश क्रमांक-माध्य/शि/५/कावि/९८५/२०१३ दिनांक.३०/११/२०१३ अन्वये, २)आदेश क्रमांक-माध्य/शि/५/कावि/९८६/२०१३ दिनांक ३०/११/२०१४ पर्यंत कामाचे आदेश देणेत आलेले आहेत. तसेच क प्रभाग व ड प्रभाग कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील शाळेवरील सुरक्षा व्यवस्था करणे कामी मे.बी.व्ही.जी.इंडिया लि. यांना अनुक्रमे आदेश क्रमांक-माध्य/शि/५/कावि/९८७/२०१३ दिनांक ३०/११/२०१३ २)आदेश क्रमांक-माध्य/शि/५/कावि/९८८/२०१३ दिनांक ३०/११/२०१३ अन्वये दिनांक ०१/१२/२०१३ ते ३०/११/२०१४ पर्यंत कामाचे आदेश देणेत आलेले आहेत. वरिल संस्था/ठेकेदार/एजन्सीज यांची कामाची मुदत दिनांक ३०/११/२०१४ रोजी संपुष्टात येत आहे. सदर कामाची मुदत दि. ३०/११/२०१४ रोजी संपुष्टात येत असुन २९४ रखवालदार मदतनीस पुरविणे करीता ई-निविदेची कार्यवाही विभागामार्फत चालू असल्याने सदर ठेकेदार/संस्था १)मे. एल.एम.सी.सि.प्रा.लि. आकुर्डी पुणे, यांना अ प्रभाग व ब प्रभाग व २)मे.बी.व्ही.जी. इंडिया लि. यांना क प्रभाग व ड प्रभाग यांना माहे ०१ डिसेंबर २०१४ पासून पुढील २ महिने किंवा ई-निविदा व्दारे पात्र ठरणारे ठेकेदार/संस्था यांना प्रत्यक्ष कामकाज आदेश निर्गत होईपर्यतच्या दिनांकापर्यंत सद्यस्थितीत चालू असलेल्या कामकाज आदेशाच्या अटी व शर्ती नुसार कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील शाळेवरील सुरक्षा व्यवस्था करणे कामीसुरक्षा रक्षक कामाचे आदेश देणे आवश्यक आहे. मा.स्थायी समिती सभा कार्यक्रम पत्रिका क्र.१४८ दि.३०/१२/२०१४ चे सभावृत्तांतानुसार विषय क्रमाक ४९ बाबत ठराव क्र.१०१४५ नुसार सदर संस्था / ठेकेदार यांना निविदेनुसार कामाचे आदेश देऊन प्रत्यक्ष कामकाज सुरु होईपर्यंतचे कालावधीस मुदतवाढीस मा.आयुक्त यांची मान्यता असली तरी त्यांना दि.३१/१/२०१५ पर्यंत मुदतवाढ देण्यास व वेळोवेळी लागु होणा-या महागाई भत्यानुसार येणा-या खर्चास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे असा ठराव मंजूर करणेत आला असल्याने ई-निविदा प्रक्रियेस लागणारा कालावधी व प्रत्यक्ष कामकाज सुरू होईपर्यंतचे कालावधी विचरात घेता संबंधित संस्था/ठेकेदार यांना

निविदेनुसार कामाचे आदेश देवून प्रत्यक्ष कामकाज सुरू होईपर्यंतचे कालावधीस मुदतवाढीस व वेळोवेळी लागु होणा-या महागाई भत्ता व इतर भत्यानुसार येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

--------

ठराव क्रमांक – १०५९५ विषय क्रमांक – २८
दिनांक – ३०/०१/२०१५ विभाग – नगरसचिव
सुचक –मा.सदगुरु कदम अनुमोदक – मा.संगिता भोंडवे
संदर्भ:- मा.नगरसचिव यांचे पत्र क्र.नस/१/कावि/३६/२०१५ दि.१७/०१/२०१५

नगरसचिव विभागामध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांनी रजा मंजूरीकामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावा सोबतचे प्रपत्र 'अ' मध्ये दर्शविलेप्रमाणे रजा मंजूरीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १०५९६ विषय क्रमांक – २९
दिनांक – ३०/०१/२०१५ विभाग – पर्यावरण अभियांत्रिकी
सुचक –मा.सुनिता वाघेरे अनुमोदक – मा.माया बारणे
संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे पत्र क्र.पअक/४/कावि/६५/१५ दि.१७/०१/२०१५

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

दि.२३/१२/२०१४ नागपूर येथील विधानपरिषद/विधान सभा हिवाळी अधिवेशनास मा.आयुक्तसो यांनी श्री.एस.एन.कुलकर्णी, कार्यकारी अभियंता (पर्यावरण) यांना पर्यावरण संबंधी उपस्थित केले जाणा-या मुदयांबाबत आवश्यक माहितीसह उपस्थित रहाणेकामी सुचना केलेली होती. त्यानुसार श्री.एस.एन.कुलकर्णी, कार्यकारी अभियंता (पर्यावरण) स्वखर्चाने उपस्थित राहिले असुन त्याकामी विमान प्रवासासाठी (येणे व जाणेसाठी) एकुण र.रु.२२,५९०/- (अक्षरी र.रु.बावीस हजार पाचशे नव्वद फक्त) चा खर्च स्वत: केलेला असल्याने त्यांना तो अदा करणे आवश्यक आहे. सबब, सदर विधानपरिषद / विधानसभा हिवाळी अधिवेशनास उपस्थित रहाणेकामी विमान प्रवासासाठी (येणे व जाणेसाठी) एकुण र.रु.२२,५९०/- (अक्षरी र.रु. बावीस हजार पाचशे नव्वद फक्त) चा खर्च पर्यावरण अभियांत्रिकी विभागाकडील **'प्रवास खर्च'** या लेखाशिर्षातुन खर्ची टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १०५९७ विषय क्रमांक – ३०
दिनांक – ३०/०१/२०१५ विभाग – इ क्षेत्रीय कार्यालय
सुचक –मा.संगिता भोंडवे अनुमोदक – मा.सदगुरु कदम
संदर्भ:- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे पत्र क्र.इक्षेका/६/कावि/२२/१५ दि.१५/१/२०१५

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या इ क्षेत्रीय कार्यालयाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.३/३०-२०१४-१५ मधील अ.क्र.०८ अन्वये, भोसरी उपविभागा अंतर्गत प्र.क्र.३३ मधील स्ट्रीट लाईटची सन २०१४-१५ मध्ये देखभाल व दुरुस्ती करणे व अनुषंगिक विद्युत विषयक कामे करणेकामी मे.एँम्प इलेक्ट्रीकल्स (नि.र.रु.७,४६,४२६/- (अक्षरी र.रु.सात लाख शेहेचाळीस हजार चारशे सव्वीस) पेक्षा ३०.०० % कमी) या ठेकेदाराबरोबर करारनामा करुन कामाचा आदेश देणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १०५९८ विषय क्रमांक – ३१

दिनांक – ३०/०१/२०१५ विभाग – मध्यवर्ती साहित्य भांडार

सुचक –मा.आशा शेंडगे अनुमोदक – मा.संध्या गायकवाड

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभां/४/कावि/४३/१५ दि.१६/१/२०१५

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

वैद्यकीय विभागाकडील निविदा क्र.१३/२०१४-१५ मधील लघुत्तम निविदाधारक मे.श्री कन्स्ट्रक्शन यांचे प्राप्त लघुत्तम दर सर्व करासहित र.रु.२६,९५,०००/- या दराने वाय.सी.एम. रुग्णालयातील न्यू पोर्ट कंपनीचे ७ नग व्हेंटिलेटर्स दुरुस्त करणेकामी येणाऱ्या र.रु.२६,९५,०००/- (अक्षरी र.रु.सव्वीस लाख पंच्याण्णव हजार फक्त) चे खर्चास तसेच सदरचा खर्च वैद्यकीय विभागाकडील उपकरणे खरेदी या लेखाशिर्षामधून खर्ची टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १०५९९ विषय क्रमांक – ३२

दिनांक – ३०/०१/२०१५ विभाग – नगररचना व विकास

सुचक –मा.संध्या गायकवाड अनुमोदक – मा.सुनिता गवळी

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/आ१०/११/१५ दि.२०/१/२०१५

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

विशेष रोटेशन जाहिरात क्र.३३२/२०१४ मधील दै.पुढारी व दै.टाईम्स ऑफ इंडिया या वृत्तपत्राचे बिल अदायगी करणे आवश्यक असलेने दै.पुढारी व दै.टाईम्स ऑफ इंडिया यांना अदा करावयाच्या र.रू.१,०६,४४०/- (अक्षरी र.रू. एक लाख सहा हजार चारशे चाळीस) या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १०६०० विषय क्रमांक – ३३

दिनांक – ३०/०१/२०१५ विभाग - मुख्यलेखापरिक्षक

सुचक –मा.बाळासाहेब तरस अनुमोदक – मा.विनायक गायकवाड

संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे पत्र क्र.मुलेप/१/कावि/६९/२०१५ दि.२०/१/२०१५

मुख्यलेखापरिक्षण विभागामध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांनी रजा मंजूरीकामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावा सोबतचे प्रपत्र 'अ' मध्ये दर्शविलेप्रमाणे रजा मंजूरीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १०६०१ विषय क्रमांक – ३४

दिनांक – ३०/०१/२०१५ विभाग– फ क्षेत्रीय कार्यालय, स्थापत्य

सुचक –मा.अतुल शितोळे अनुमोदक – मा.प्रसाद शेट्टी

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.फक्षेका/स्था/कावि/२१५९/१४ दि.२०/११/२०१४

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

फ क्षेत्रीय कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र.२८ मधील आरक्षण क्र.८५ मध्ये पी जी इंस्टीट्युट साठी होस्टेल इमारत नागरी आरोग्य केंद्र व नेत्र रूग्णालय इमारत बांघणे या कामासाठी महानगरपालिका पॅनल वरील मे.शशी प्रभू ॲण्ड असोसिएट्स यांची वास्तुविशारद/सल्लागार म्हणून नेमणूक करणे व त्यांना केलेल्या कामासाठी होणारी फी (अंदाजपत्रकीय रक्कमेच्या २% अधिक सर्व्हिस टॅक्स) त्यांना अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – १०६०२ विषय क्रमांक – ३५

दिनांक – ३०/०१/२०१५ विभाग – उद्यान-विद्युत

सुचक –मा.सदगुरु कदम अनुमोदक – मा.संगिता भोंडवे

संदर्भ:- मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.उद्यान/वि/३६९/१५ दि.२०/१/२०१५

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

यमुनानगर से.२१ येथील आहिल्यादेवी होळकर उद्यान येथे वीज पुरवठा घेणेकरीता कोटेशन शुल्क र.रुपये ५,४१९/- (अक्षरी र.रु. पाच हजार चारशे एकोणीस फक्त) म.रा.वि.वि.कं.लि. यांस करारनामा न करता अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १०६०३ विषय क्रमांक – ३६

दिनांक – ३०/०१/२०१५ विभाग – क क्षेत्रीय कार्यालय

सुचक –मा.सुनिता वाघेरे अनुमोदक – मा.माया बारणे

संदर्भ:- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे पत्र क्र.कक्षे/लेखा/नि.क्र./१५/७५३/२०१४ दि.२९/१२/२०१४

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या क क्षेत्रीय कार्यालयाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२/२०१४-१५ मधील अ.क्र.७० अन्वये, प्र.क्र.४० खराळवाडी येथे ठिकठिकाणी पावसाचा निचरा करणेकामी पाईपलाईन टाकणे व चेंबर बांधणेकामी मे.ए.एम.एंटरप्रायजेस (नि.र.रु.९,१०,१७८/- (अक्षरी र.रु.नऊ लाख दहा हजार एकशे एक्काहत्तर) पेक्षा -४१.९९% कमी) या ठेकेदाराबरोबर करारनामा करुन कामाचा आदेश देणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १०६०४ विषय क्रमांक – ३७

दिनांक – ३०/०१/२०१५ विभाग – क क्षेत्रीय कार्यालय

सुचक –मा.संगिता भोंडवे अनुमोदक – मा.सदगुरु कदम

संदर्भ:- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे पत्र क्र.कक्षे/लेखा/नि.क्र./१५/७४९/२०१४ दि.१७/१२/२०१४

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या क क्षेत्रीय कार्यालयाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२/२०१४-१५ मधील अ.क्र.७६ अन्वये, प्र.क्र.४० खराळवाडी येथे ठिकठिकाणी पावसाचा निचरा करणेकामी पाईपलाईन टाकणे व चेंबर बांधणेकामी मे.ए.एम.एंटरप्रायजेस (नि.र.रु.९,०९,९०९/- (अक्षरी र.रु.नऊ लाख नऊ हजार नऊशे नऊ) पेक्षा -४०.५०% कमी) या ठेकेदाराबरोबर करारनामा करुन कामाचा आदेश देणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १०६०५ विषय क्रमांक – ३८
दिनांक – ३०/०१/२०१५ विभाग – क क्षेत्रीय कार्यालय
सुचक –मा.आशा शेंडगे अनुमोदक – मा.सुनिता गवळी

संदर्भ:- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे पत्र क्र.कक्षे/लेखा/नि.क्र./१५/७५१/२०१४ दि.१७/१२/२०१४

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या क क्षेत्रीय कार्यालयाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२/२०१४-१५ मधील अ.क्र.८६ अन्वये, प्र.क्र.४० खराळवाडी येथे ठिकठिकाणी पावसाचा निचरा करणेकामी पाईपलाईन टाकणे व चेंबर बांधणेकामी मे.ए.एम.एंटरप्रायजेस (नि.र.रु.९,०९,९०९/- (अक्षरी र.रु.नऊ लाख नऊ हजार नऊशे नऊ) पेक्षा -४०.५०% कमी) या ठेकेदाराबरोबर करारनामा करुन कामाचा आदेश देणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १०६०६ विषय क्रमांक – ३९
दिनांक – ३०/०१/२०१५ विभाग – क क्षेत्रीय कार्यालय
सुचक –मा.संध्या गायकवाड अनुमोदक – मा.सुनिता गवळी

संदर्भ:- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे पत्र क्र.कक्षे/लेखा/नि.क्र./१५/११/२०१५ दि.८/१/२०१५

विषय - कासारवाडी उपविभागातील प्र.क्र.६४ मधील स्ट्रीट लाईटची सन २०१४-१५ मध्ये दुरुस्ती व देखभालीची कामे करणेबाबत...

विषय क्रमांक ३९चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १०६०७ विषय क्रमांक – ४०
दिनांक – ३०/०१/२०१५ विभाग – क क्षेत्रीय कार्यालय
सुचक –मा.बाळासाहेब तरस अनुमोदक – मा.विनायक गायकवाड

संदर्भ:- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे पत्र क्र.कक्षे/लेखा/नि.क्र./१५/१३/२०१५ दि.८/१/२०१५

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या क क्षेत्रीय कार्यालयाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.३/२०१४-१५ मधील अ.क्र.१३ अन्वये, कासारवाडी उपविभागातील प्र.क्र.६३ मधील स्ट्रीट लाईटची सन २०१४-१५ मध्ये दुरुस्ती व देखभालीची कामे करणेकामी मे.विमलाबाई इले. कार्पो. (नि.र.रु.९,३३,४४२/- (अक्षरी र.रु.नऊ लाख तेहतीस हजार चारशे बेचाळीस) पेक्षा -३७.४५% कमी) या ठेकेदाराबरोबर करारनामा करुन कामाचा आदेश देणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १०६०८ विषय क्रमांक – ४१
दिनांक – ३०/०१/२०१५ विभाग – क क्षेत्रीय कार्यालय
सुचक –मा.अतुल शितोळे अनुमोदक – मा.प्रसाद शेट्टी
संदर्भ:- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे पत्र क्र.कक्षे/लेखा/नि.क्र./१५/५/२०१५ दि.६/१/२०१५

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या क क्षेत्रीय कार्यालयाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.३/२०१४-१५ मधील अ.क्र.२९ अन्वये, क क्षेत्रिय कार्यलयांतर्गत मनपा उपविभागामध्ये होणाऱ्या विविध संत तुकाराम बीज व संत तुकारामनगर फुटबॉल स्पर्धा कार्यक्रमाकरीता ध्वनीक्षेपण विद्युत व्यवस्था करणेकामी मे.मोरया मंडप डेकोरेटर्स (नि.र.रु.९,५२,०६५/- (अक्षरी र.रु.नऊ लाख बावन्न हजार पासष्ट) पेक्षा -१.५०% कमी) या ठेकेदाराबरोबर करारनामा करुन कामाचा आदेश देणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १०६०९ विषय क्रमांक – ४२
दिनांक – ३०/०१/२०१५ विभाग – क क्षेत्रीय कार्यालय
सुचक –मा.विनायक गायकवाड अनुमोदक – मा.प्रसाद शेट्टी
संदर्भ:- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे पत्र क्र.कक्षे/लेखा/नि.क्र./१५/७/२०१५ दि.६/१/२०१५

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या क क्षेत्रीय कार्यालयाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.३/२०१४-१५ मधील अ.क्र.३० अन्वये, क क्षेत्रिय कार्यलयांतर्गत माहे एप्रिल २०१५ मध्ये होणाऱ्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर / मा.फुले जयंती महोत्सव कार्यक्रमासाठी ध्वनीक्षेपण विद्युत व्यवस्था करणेकामी मे.मोरया मंडप डेकोरेटर्स (नि.र.रु.७,३३,५४०/- (अक्षरी र.रु.सात लाख तेहतीस हजार पाचशे चाळीस) पेक्षा -१.५० % कमी) या ठेकेदाराबरोबर करारनामा करुन कामाचा आदेश देणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १०६१० विषय क्रमांक – ४३
दिनांक – ३०/०१/२०१५ विभाग – स्थापत्य
सुचक –मा.सुनिता वाघेरे अनुमोदक – मा.माया बारणे
संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/१अ/कावि/१४/२०१५ दि.२०/१/२०१५

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.अ मुख्यालय/HO/७/२०१४-१५ मधील अ.क्र. ४ अन्वये, प्र.क्र.१४ भ.रा.अंतर्गत से.क्र.२४ अ डांबरीकरण करणेकामी मे.एच.सी. कटारीया (नि.र.रू.९,३३,५१४/- (अक्षरी र.रू.नऊ लाख तेहतीस हजार पाचशे चौदा) पेक्षा ३.१०% कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.९,४९,८०४/- (अक्षरी र.रु.नऊ लाख एकोणपन्नास हजार आठशे चार) पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १०६११ विषय क्रमांक – ४४
दिनांक – ३०/०१/२०१५ विभाग – झोनिपु स्थापत्य
सुचक –मा.संगिता भोंडवे अनुमोदक – मा.सदगुरु कदम

संदर्भ:- मा.सक्षम प्राधिकारी तथा सहा.आयुक्त यांचे पत्र क्र.झोनिपु/स्था/नि/कावि/१२१/१५ दि.२१/१/२०१५

मा. सक्षम प्राधिकारी तथा सहा.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या झोनिपु स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१/८८-२०१४-१५ मधील अ.क्र.४८ अन्वये, प्रभाग क्र.५६ मधील राजीव गांधीनगर झोपडपट्टयामध्ये स्थापत्य विषयक कामांची दुरुस्तीची कामे करणेकामी मे.एम.बी.कंन्स्ट्रक्शन (नि.र.रु.९,३२,८४०/-(अक्षरी र.रु.नऊ लाख बत्तीस हजार आठशे चाळीस) पेक्षा ३७.१०% कमी) या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.५,८६,७५६/- पर्यंत काम करुन घेणेस बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचे बरोबर कामाचा करारनामा करुन एजन्सीस कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १०६१२ विषय क्रमांक – ४५
दिनांक – ३०/०१/२०१५ विभाग – झोनिपु स्थापत्य
सुचक –मा.आशा शेंडगे अनुमोदक – मा.संध्या गायकवाड

संदर्भ:- मा.सक्षम प्राधिकारी तथा सहा.आयुक्त यांचे पत्र क्र.झोनिपु/स्था/नि/कावि/१२०/१५ दि.२१/१/२०१५

मा. सक्षम प्राधिकारी तथा सहा.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या झोनिपु स्थापत्य विभागाकडील नि.नो. क्र.१/८८-२०१४-१५ मधील अ.क्र.१५ अन्वये, प्रभाग क्र.६१ मधील झोपडपट्टीतील इमारती व शौचालयाची देखभाल दुरुस्ती करणेकामी मे.सिध्दीकी प्लंबीग अँन्ड ड्रेनेज सिव्हील कॉन्ट्रक्टर (नि.र.रु.९,३३,५९०/- (अक्षरी र.रु.नऊ लाख तेहतीस हजार पाचशे नव्वद फक्त) पेक्षा ३९.३९ % कमी) या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.५,६५,८४९/- पर्यंत काम करुन घेणेस बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचे बरोबर कामाचा करारनामा करुन एजन्सीस कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १०६१३ विषय क्रमांक – ४६
दिनांक – ३०/०१/२०१५ विभाग – स्थापत्य
सुचक –मा.संध्या गायकवाड अनुमोदक – मा.सुनिता गवळी

संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/२ब/कावि/२७/१५ दि.२१/१/२०१५

मा. शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२०/२०१४-१५ मधील अ.क्र.४ अन्वये, प्र.क्र.२४ मध्ये उद्यानात स्थापत्य विषयक कामे करणेकामी मे.आर.एम.एंटरप्रायझेस (नि.र.रू.१४,००,२२८/- (अक्षरी र.रू. चौदा लाख दोनशे अठ्ठावीस) पेक्षा ४६.३०% कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.७,८९,५१९/- (अक्षरी र.रु.सात लाख एकोणनव्वद हजार पाचशे एकोणीस) पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – १०६१४ विषय क्रमांक – ४७

दिनांक – ३०/०१/२०१५ विभाग – झोनिपु स्थापत्य

सुचक –मा.बाळासाहेब तरस अनुमोदक – मा.विनायक गायकवाड

संदर्भ:- मा.सक्षम प्राधिकारी तथा सहा.आयुक्त यांचे पत्र क्र.झोनिपु/स्था/नि/कावि/१२२/१५ दि.२१/१/२०१५

मा. सक्षम प्राधिकारी तथा सहा.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या झोनिपु स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१/८८-२०१४-१५ मधील अ.क्र.७६ अन्वये, प्रभाग क्र.४२ मधील भाटनगर पुनर्वसन प्रकल्पाअतंर्गत स्थापत्य विषयक कामांची देखभाल व दुरुस्तीची कामे करणेकामी मे.सुजल कंन्स्ट्रक्शन (नि.र.रु ९,३२,८४०/- (अक्षरी र.रु.नऊ लाख बत्तीस हजार आठशे चाळीस) पेक्षा ३८.१०% कमी) या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.५,७७,४२८/- पर्यंत काम करुन घेणेस बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचे बरोबर कामाचा करारनामा करुन एजन्सीस कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १०६१५ विषय क्रमांक – ४८

दिनांक – ३०/०१/२०१५ विभाग – मुख्यलेखापरिक्षक

सुचक –मा.अतुल शितोळे अनुमोदक – मा.प्रसाद शेट्टी

संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे पत्र क्र.मुलेप/१/कावि/०९/२०१५ दि.२१/१/२०१५

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागाकडील माहे डिसेंबर २०१४ मधील अद्ययावत एकूण कामकाज विषयक गोषवारा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १०६१६ विषय क्रमांक – ४९

दिनांक – ३०/०१/२०१५ विभाग – मुख्यलेखापरिक्षक

सुचक –मा.बाळासाहेब तरस अनुमोदक – मा.अतुल शितोळे

संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे पत्र क्र.मुलेप/१/कावि/१०/२०१५ दि.२१/१/२०१५

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.२२.१२.२०१४ ते दि.२८.१२.२०१४ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/१०/२०१५ दि.२१.१.२०१५ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १०६१७ विषय क्रमांक – ५०

दिनांक – ३०/०१/२०१५ विभाग – मुख्यलेखापरिक्षक

सुचक –मा.सुनिता वाघेरे अनुमोदक – मा.माया बारणे

संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे पत्र क्र.मुलेप/१/कावि/११/२०१५ दि.२१/१/२०१५

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.२९.१२.२०१४ ते दि.४.१.२०१५ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/११/२०१५ दि.२१.१.२०१५ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – १०६१८ विषय क्रमांक – ५१

दिनांक – ३०/०१/२०१५ विभाग – विद्युत मुख्य कार्यालय

सुचक –मा.संगिता भोंडवे अनुमोदक – मा.सदगुरु कदम

संदर्भ:- मा.विकास अभियंता यांचे पत्र क्र.विमुका/५/कावि/२३/२०१५ दि.२२/१/२०१५

मा.विकास अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील नि.नो.क्र.०३/२०१४-२०१५ मधील अ.क्र.२३ अन्वये, मधुबन प्र.क्र.५९ येथील अंतर्गत रस्त्यांवर डेकोरेटीव्ह पोल बसविणेकामी मे.इलेक्ट्रो मॅकॅनिक्स (नि.र.रु.१४,९१,२६६/- (अक्षरी र.रु.चौदा लाख एक्यान्नव हजार दोनशे सहासष्ट) पेक्षा २०.४० % कमी) दराने त्यांच्याबरोबर करारनामा करुन कामाचा आदेश देणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १०६१९ विषय क्रमांक – ५२

दिनांक – ३०/०१/२०१५ विभाग – मुख्यलेखापरिक्षक

सुचक –मा.आशा शेंडगे अनुमोदक – मा.सुनिता वाघेरे

संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे पत्र क्र.मुलेप/१/कावि/१२/२०१५ दि.२१/०१/२०१५

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.५.१.२०१५ ते दि.११.१.२०१५ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/१२/२०१५ दि.२१.१.२०१५ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १०६२० विषय क्रमांक – ५३

दिनांक – ३०/०१/२०१५ विभाग – क प्रभाग कार्यालय

सुचक –मा.संध्या गायकवाड अनुमोदक – मा.सुनिता गवळी

संदर्भ:- मा.प्रभाग अधिकारी यांचे पत्र क्र.कप्र/लेखा/नि.क./१५/कावि/२७/१५ दि.२२/१/२०१५

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या क क्षेत्रीय कार्यालयाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.७/२०१४-१५ मधील अ.क्र.४ अन्वये, बोपखेल वॉर्ड क्र.६४ मध्ये गावठाण भागात ठिकठिकाणी पावसाळी गटर्स करणेकामी मे.शिवकुमार कन्स्ट्रक्शन (नि.र.रु.७,००,०५८/- (अक्षरी र.रु.सात लाख अठ्ठावन्न) पेक्षा –४०.५१% कमी) या ठेकेदाराबरोबर करारनामा करुन कामाचा आदेश देणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १०६२१ विषय क्रमांक – ५४
दिनांक – ३०/०१/२०१५ विभाग – क क्षेत्रीय कार्यालय
सुचक –मा.बाळासाहेब तरस अनुमोदक – मा.विनायक गायकवाड
संदर्भ:- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे पत्र क्र.कक्षे/लेखा/नि.क्र./१५/२४/२०१५ दि.२१/१/२०१५

मा. क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या क क्षेत्रीय कार्यालयाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.५/२०१४-१५ अन्वये, पवनाथडी यात्रा २०१५ करीता विद्युत प्रकाश व्यवस्था ध्वनिक्षेपण व सीसीटीव्ही व्यवस्था करणेकामी मे.मोरया मंडप डेकोरेटर्स (नि.र.रु.९,९९,७७०/- (अक्षरी र.रु.नऊ लाख नव्यान्नव हजार सातशे सत्तर) पेक्षा –३९.७२ % कमी) या ठेकेदाराबरोबर करारनामा करुन कामाचा आदेश देणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १०६२२ विषय क्रमांक – ५५
दिनांक – ३०/०१/२०१५ विभाग – स्थापत्य
सुचक –मा.अतुल शितोळे अनुमोदक – मा.प्रसाद शेट्टी
संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/२ब/कावि/३०/२०१५ दि.२२/१/२०१५

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२०/२०१४-१५ मधील अ.क्र.२६ अन्वये, प्र.क्र.२१ मध्ये उद्यानात स्थापत्य विषयक कामे करणेकामी मे.प्रज्ञा कंन्स्ट्रक्शन (नि.र.रू.१४,००,१६५/- (अक्षरी र.रू. चौदा लाख एकशे पासष्ट) पेक्षा ४१.६१ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.८,५८,४३४/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १०६२३ विषय क्रमांक – ५६
दिनांक – ३०/०१/२०१५ विभाग – स्थापत्य
सुचक –मा.सदगुरु कदम अनुमोदक – मा.संगिता भोंडवे
संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/१अ/कावि/१७/२०१५ दि.२३/१/२०१५
विषय - प्रभाग क्रमांक १५ दत्तवाडी आकुर्डी येथील लोकमान्य हॉस्पीटल चौक ते रेल्वे लाईन पर्यंत डी.पी.रस्त्यांचे डांबरीकरण करणेबाबत...

विषय क्रमांक ५६चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १०६२४ विषय क्रमांक – ५७
दिनांक – ३०/०१/२०१५ विभाग – विद्युत
सुचक –मा.सुनिता वाघेरे अनुमोदक – मा.माया बारणे

संदर्भ:- मा.विकास अभियंता यांचे पत्र क्र.विमुका/८/कावि/१४/२०१५ दि.२२/१/२०१५

मा.विकास अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील नि.नो.क्र.६/२०१४-२०१५ मधील अ.क्र.८ अन्वये, प्र.क्र.५२ रस्त्यावरील दिवाबत्ती व्यवस्थेची वार्षिक देखभाल व दुरुस्ती करणे कामी मे.जी.पी.इलेक्ट्रीक कंपनी (नि.र.रु.९,३३,६८५/- (अक्षरी र.रु.नऊ लाख तेहतीस हजार सहाशे पंच्याऐंशी) पेक्षा ३८.०२ % कमी) या ठेकेदाराबरोबर करारनामा करुन कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १०६२५ विषय क्रमांक – ५८
दिनांक – ३०/०१/२०१५ विभाग – विद्युत
सुचक –मा.संगिता भोंडवे अनुमोदक – मा.सदगुरु कदम

संदर्भ:- मा.विकास अभियंता यांचे पत्र क्र.विमुका/८/कावि/१८/२०१५ दि.२२/१/२०१५

मा.विकास अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील नि.नो.क्र.६/२०१४-२०१५ मधील अ.क्र.२४ अन्वये, प्र.क्र.२० मधील नव्याने तयार होणाऱ्या रस्त्यावर दिवाबत्तीची व्यवस्था करणे (२०१४-१५) कामी मे.इलेक्ट्रो मेकॉनिक्स (नि.र.रु.१५,९८,६४०/- (अक्षरी र.रु.पंधरा लाख अठ्ठ्यान्नव हजार सहाशे चाळीस) पेक्षा १५.१० % कमी) या ठेकेदाराबरोबर करारनामा करुन कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

यानंतर मा.सभाध्यक्ष यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(शांताराम कोंडीबा भालेकर)
**सभाध्यक्ष**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/१०/कावि/१३/२०१५
दिनांक - ३१/०१/२०१५



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.